महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तेरा दिनांक :- १९ डिसेंबर, २०२३

## -:प्रसिद्धीपत्रक:-

विषय :- दिव्यांग व्यक्तिंना भरपाई वेळ व दिव्यांग व्यक्ती लिहिण्याकरीता सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :- शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/ दि. क.२, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग व्यक्तिंना भरपाई वेळ व दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह संदर्भीत शासन परिपत्रकातील तरतुदिनुसार विनंती अर्ज सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

२. आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिराती/अधिसूचनेस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे:-

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | जाहिरात क्रमांक | परीक्षेचा दिनांक | विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य सेवा मुख्य परीक्षा – २०२३ | १२१/२०२३ | २०, २१ व २२ जानेवारी, २०२४ | २७ डिसेंबर, २०२३ |
| २ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा – २०२३ | १२२/२०२३ | २८ जानेवारी, २०२४ | |
| ३ | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा – २०२३ | १२३/२०२३ | २८ जानेवारी, २०२४ | |
| ४ | निरीक्षक वैधमापन, गट-ब मुख्य परीक्षा – २०२३ | १२४/२०२३ | ४ फेब्रुवारी, २०२४ | |
| ५ | महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा – २०२३ | १२५/२०२३ | १० फेब्रुवारी, २०२४ | |

३. लेखनिकाची मागणी करणा-या दिव्यांग उमेदवारांचे लक्ष संदर्भीत शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ६ मधील **"लेखनिक/ वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी"** या तरतुदीकडे विशेषत्वाने वेधण्यात येत आहे. सदर परीक्षांकरिता किमान शैक्षणिक अर्हता विविध विषयातील पदवी असल्याने लेखनिकाची कमाल शैक्षणिक अर्हता पदवीच्या एक टप्पा कमी म्हणजे १२ वी असणे आवश्यक आहे. सदर शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार दिव्यांग उमेदवाराने लेखनिकाची मागणी करणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त परीक्षेसाठी विनंती अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत प्रसिध्दीपत्रकातील तरतुदींच्या आधारे विहित पध्दतीने परवानगीसाठी पुन्हा विनंती अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

५. केवळ संबंधित अधिसूचनेस अनुसरुन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

६. लेखनिक आवश्यक असलेल्या उमेदवारांनी प्रपत्र १/प्रपत्र २, लक्षणीय दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र व नमुना क्रमांक ११ अशी कागदपत्रे सादर करावीत.

७. केवळ भरपाई वेळ आवश्यक असलेल्या उमेदवारांनी केवळ लक्षणीय दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे.

८. अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित/नसलेले)/मेंदुचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांनी नमुना क्रमांक ११ सादर करणे आवश्यक नाही.

९. विहित प्रपत्र १/ प्रपत्र २ व नमुना क्रमांक ११ आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०. प्रस्तुत प्रकरणी उमेदवारांनी शंका/समाधानासाठी ०२२-६९३८५९८३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सह सचिव, परीक्षा पूर्व

ठिकाण : नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग